# सोलापूर शहर पोलीस

# पोलीस शिपाई भरती - 2022/23

पोलीस शिपाई भरती, 2022-23 साठी उमेदवारांची लेखी परीक्षा **रविवार, दिनांक 07/07/2024 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 वा. दरम्यान SVCS HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE (श्री वीरतपस्वी चन्नावीर शिवाचार्य हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज), एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर** या ठिकाणी घेण्यात आली आहे.

सदर लेखी परीक्षेनंतर या कार्यालयाकडून उत्तरपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर उत्तरपत्रिकेच्या अनुषंगाने उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या आक्षेपांची सखोल पडताळणी केल्यानंतर खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यात आली आहे.

**आक्षेप क्रमांक - 1**

**मुळ प्रश्न - (प्रश्नसंच A मधिल 50, B मधिल 75, C मधिल 25 व D मधिल 100)**

माझे घड्याळ तासाला 15 सेकंदांनी पुढे पळते. मी मंगळवारी सकाळी 10.00 वा. घड्याळ बरोबर लावले, तर शनीवारी सकाळी 06.00 वा. प्रत्यक्षात त्या घड्याळात किती वाजले असतील ?

A) 6.16 PM B) 6.30 PM
C) 6.26 PM D) 6.36 PM

**आक्षेप: -** **सदरच्या प्रश्नाचे बरोबर उत्तराचा एकही पर्याय नाही.**

**निर्णय: -** **सदरच्या प्रश्नाचे बरोबर उत्तर 6.23 PM हे एकाही पर्यायात दिलेले नसल्याने सदरच्या प्रश्नासाठी सर्वांना 1 गुण देण्यात येत आहे.**

**आक्षेप क्रमांक - 2**

**मुळ प्रश्न - (प्रश्नसंच A मधिल 85, B मधिल 85, C मधिल 35 व D मधिल 10)**

वीर आणि आदित्य शाळेतून घरी जाण्यासाठी पायी चालण्यासाठी सुरूवात केली. आदित्यचा वेग होता प्रती तास 3 किमी तर वीरचा वेग होता प्रती तास 3.75 किमी. आदित्य पेक्षा वीर 30 मिनीटाने अगोदर घरी पोहोचला. तर शाळा आणि घराच्या मध्ये अंतर किती आहे ?

A) 6 किमी B) 7 किमी
C) 8 किमी D) 9.5 किमी

**आक्षेप: -** **सदरच्या प्रश्नाचे बरोबर उत्तराचा एकही पर्याय नाही.**

**निर्णय: -** **सदरच्या प्रश्नाचे बरोबर उत्तर 7.5 किमी हे एकाही पर्यायात दिलेले नसल्याने सदरच्या प्रश्नासाठी सर्वांना 1 गुण देण्यात येत आहे.**

## आक्षेप क्रमांक - 3

### मुळ प्रश्न - (प्रश्नसंच A मधिल 14, B मधिल 14, C मधिल 89 व D मधिल 64)

"गुरूजी शाळेत आत्ताच आले" हे वाक्य व्याकरणदृष्ट्या :

A) अनेकवचनी आहे.    B) आदरार्थी आहे.
C) आदरार्थी अनेकवचन आहे.    D) आदरार्थी बहुवचन आहे.

**आक्षेप: -** **सदरच्या प्रश्नाचे C व D हे दोन्ही पर्याय बरोबर आहेत. उत्तरतालीकेमध्ये दिलेला B हा पर्याय चुकीचा आहे.**

**निर्णय: -** **सदरच्या प्रश्नाचे C व D हे दोन्ही पर्याय बरोबर आहेत. सदरच्या प्रश्नासाठी C व D यापैकी कोणताही एक पर्याय निवडला असेल तर त्यास 1 गुण देण्यात येईल.**

## आक्षेप क्रमांक - 4

### मुळ प्रश्न - (प्रश्नसंच A मधिल 26, B मधिल 01, C मधिल 76 व D मधिल 51)

14, 26, 35, 50, 63, ? , 90

A) 81    B) 80
C) 83    D) 82

**आक्षेप: -** **सदरच्या प्रश्नाचे D हे उत्तर दिले आहे. मात्र सदर प्रश्नाचे बरोबर उत्तर 81 असून A हा पर्याय बरोबर आहे.**

**निर्णय: -** **सदरच्या प्रश्नामध्ये दिलेल्या अंकांमध्ये typing error असल्याने सदर प्रश्नासाठी सर्वांना 1 गुण देण्यात येत आहे.**

**याव्यतिरीक्त आलेल्या आक्षेपांची सखोल तपासणी करून पाहिली असता, त्यामध्ये तथ्य निदर्शनास न आल्याने व उत्तरतालिकेमध्ये दिलेला पर्याय बरोबर असल्याने असे आक्षेप फेटाळण्यात येत आहेत.**

AJIT AMBADAS BORHADE
Digitally signed by AJIT AMBADAS BORHADE
Date: 2024.07.08 12:06:32 +05'30'

**(अजित बोऱ्हाडे)**
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
सोलापूर शहर